तरुण भारत सोमवार, २८ नोव्हेंबर २०२२

# स्पर्धेच्या युगात कर्ज देणे, वसूल करणे जिकीरीचे

■ डॉ. राजेंद्र हिरेमठ यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
गडहिंग्लज

आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलते अर्थकारण त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील दबाव, राष्ट्रीय व खासगी वित्तीय संस्थांशी असलेल्या स्पर्धेच्या काळात कर्ज देणे आणि वसूल करणे हे मोठ्या जिकीरीचे काम सध्याच्या युगात असल्याचे सांगत 'रवळनाथ'च्या सजग संचालक व कर्मचाऱ्यांनी हे आवाहन सहज पेलल्याचे मत जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी व्यक्त केले.

बसर्गे गावचे सुपुत्र डॉ. हिरेमठ यांनी रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी रवळनाथची माहिती घेत झेप ॲकॅडमी, इंटेक करीअर फौंडेशन यांचे कार्य पाहून कौतुक केले. निवारा चळवळीत रवळनाथचे कार्य मोलाचे असल्याचे सांगून सहकाराच्या पडझडीच्या काळातील ही यशस्वी मॉडेल सर्वदूर पसरवण्याची गरज असल्याचे सांगितले. संचालक विजय आरबोळे अध्यक्षस्थानी होते. सुरवातीस डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले.



गडहिंग्लज : डॉ. राजेंद्र हिरेमठ यांचा सत्कार करताना विजय आरबोळे, शेजारी संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी.

यावेळी कल्पना हिरेमठ, नकाते, महेश मजती, मीना रिंगणे, रेखा पोतदार, संदीप कागवाडे, शिवानंद घुगरे, सुनिलदत्त जाधव, विजय घुगरे, अशोक सुळकुडे, बाबासाहेब मार्तंड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. सागर माने यांनी सूत्रसंचालन केले, तर दत्तात्रय मायदेव यांनी आभार मानले.